महाराष्ट्र टाइम्स

# मराठवाडा रेल्वे मार्गांना सरकार पावले

महाराष्ट्र टाइम्स| Mar 10, 2019, 04.00 AM IST



म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

गेल्या पाच वर्षांपासून रखडलेला दौलताबाद - चाळीसगाव रेल्वे मार्ग, रोटेगाव - कोपरगाव कॅडलाइन मार्ग, लातूर रोड ते गुलबर्गा, रोटेगाव ते कोपरगाव आणि औरंगाबाद ते चाळिसगाव या रेल्वेमार्गांसाठी ५० टक्के निधी राज्य सरकार देणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेमंत्री पीयूष गोयल यांना पाठविलेल्या पत्रात ही माहिती दिली आहे.

मराठवाड्यातील लातूर रोड ते गुलबर्गा हा रेल्वे मार्ग जोडण्यासाठी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांनी मागणी केली होती. हा मार्ग जोडल्याने लातूर रोड ते गुलबर्गा प्रवासाचे अंतर कमी होणार आहे. याशिवाय औरंगाबाद ते चाळीसगाव मार्ग तयार झाल्यास औरंगाबाद रेल्वे मार्गावरील उत्तरेकडे जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांचे तीन ते चार तास वाचतील. रोटेगाव कोपरगाव या प्रस्तावित रेल्वे मार्गामुळे शिर्डी दर्शनासाठी येणाऱ्या प्रवाशांनाही रेल्वे सुविधा मिळणार आहे. या दोन्ही रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. औरंगाबाद चाळीसगाव रेल्वे मार्गाबाबत रेल्वे संघर्ष समितीचे अनंत बोरकर यांनी 'पीएमओ' कार्यालयाकडे विचारणा केली होती. हा मार्ग रद्द झाल्याचे उत्तर बोरकर यांना देण्यात आले होते.

'मटा'ने हे वृत्त प्रकाशित केल्यानंतर मराठवाडा विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. भागवत कराड, अनंत बोरकर यांनी या मार्गाचा पाठपुरावा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केला होता. दौलताबाद - चाळीसगावसह रोटेगाव कोपरगाव कॅडलाइन रेल्वे मार्गासाठी ओमप्रकाश वर्मा, प्रल्हाद पारटकर, संतोष भाटीया, चंद्रकांत मेने, वर्धमान जैन यासह आमदार अतुल सावे यांनी प्रयत्न केले होते. या दोन्ही मार्गाच्या अनुषंगाने रेल्वे संघर्ष समितीचे अनंत बोरकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पीयूष गोयल, सुभाष भांबरे, आमदार पाटील यांच्याकडे मागणीबाबत चर्चा केली होती. यासाठी विजया रहाटकर यांच्यासह भाजपच्या अन्य नेत्यांनीही प्रयत्न केले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या मार्गासाठी पन्नास टक्के निधी देण्यास कसलिही अडचण नसल्याचे कळवले आहे.

---

मटा भूमिका

---

उशिरा दिला न्याय

---

मराठवाड्याला रेल्वे मार्गाबाबत संघर्षाशिवाय आजवर काहीही मिळाले नाही. दौलताबाद - चाळीसगाव रेल्वे मार्गासाठीही आमदार प्रशांत बंब यांचा गेल्या पाच वर्षांपासून पाठपुरावा सुरू होता. दौलताबाद ते चाळीसगाव रेल्वे मार्ग हा ९० किलोमीटरचा आहे, तर रोटेगाव- कोपरगाव रेल्वे २२ किमीचा आहे. या मार्गाला गेल्या दोन वर्षात मंजुरी मिळाली असती, तर निश्चितच आतापर्यंत रेल्वे मार्गाच्या कामाला सुरुवात झाली असती. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर ही मागणी मान्य केल्याने मराठवाड्याला उशिरा का होईना न्याय मिळाला आहे.